# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 182 /2020 दिनांकः 04/ 04/2020

**वाचा** — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 160 /2020 दिनांक 31.03.2020
6. गृह मंत्रालय भारत सरकार यांचे NO.40-3/2020-DM-I(A) दिनांक 3/4/2020.

**( कृषी यंत्रणेची दुकाने, ट्रक दुरुस्तीची दुकाने ,चहा/ चहापत्ती पत्ती उद्योग सुरु ठेवणे बाबत )**

## आदेश

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने,कोव्हीड — 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणुमूळे (COVID-१९) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयामध्ये दिनांक 14.04.2020 चे मध्यरात्रीपर्यंत जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवा वगळता सिमाबंदी व संचारबंदी लावण्यात आली आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** गृह मंत्रालय भारत सरकार यांचे NO.40-3/2020-DM-I(A) दिनांक 3/4/2020 चे आदेशाद्वारे अतिरिक्त मार्गदर्शक तत्वे जाहीर करण्यात आली आहेत.

**त्याअर्थी,** मी, **जितेंद्र पापळकर,**भाप्रसे **जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचनेनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार जिल्हयातील संचारबंदीच्या कालावधीमध्ये खालील प्रमाणे नमूद केलेल्या व्यवसायांना विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार वगळण्यात येत असल्याबाबतचे आदेश पारीत करित आहे.

1. **कृषी यंत्रणेची दुकाने, त्याचे सुटे भाग ,(पुरवठा साखळी सह) व दुरुस्ती करण्याकरिता खुली ठेवण्यात येतील.**
2. **महामार्गावरील ट्रक दुरुस्तीची दुकाने ,प्राधान्याने पेट्रोलपंप व डीझेलपंपा जवळील.**
3. **चहा/ चहापत्ती पत्ती उद्योग ( एकूण कर्मचारीपैकी जास्तीत जास्त 50 टक्के कर्मचारी )**

## अटी व शर्ती

1. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सदर मालाची हाताळणी करणारे कर्मचारी / कामगार यांना मास्क ,हॅन्डग्लोज, सॅनिटायझर व इरत प्रतिबंधात्मक साहित्य उपलब्ध करुन देण्यात यावे.
2. संबंधित ठिकाणी असलेल्या मजूरांची राहण्याची तसेच त्यांचेमध्ये सुरक्षीत अंतर ठेवण्यात यावे.
3. सदर मजूरांना अन्न व इतर आवश्यक साहीत्य सकाळी 11.00 ते 2.00 तसेच सायं. 06.00 ते 08.00 या वेळेदरम्यान उपलब्ध करुन देण्यात यावे.
4. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष २/प्रस/गृह/कावि 98/2020 दिनांक 23.3.2020 नुसार पांच किंवा त्यापेक्षा अधिक कामगार/ कर्मचारी हे एकत्र येवून काम करणार नाहीत व कामगार घरी जातांना एकत्रित जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
5. या कार्यालयाकडून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

जिल्हाधिकारी अकोला यांचे कार्यालय

(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)
**जिल्हादंडाधिकारी, अकोला**

NitinN 161

**प्रतिलिपी-**

1. मा. विभागीय आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
3. उपजिल्हा निंबधक सहकारी संस्था अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता
4. प्रादेशिक व्यवस्थापक, एमआयडीसी अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता
5. उपविभागीय अधिकारी ---------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
6. तहसिलदार -------------------------------------- यर्च यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
7. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर बातमी विनामुल्य प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याकरिता.

**जिल्हादंडाधिकारी, अकोला**

जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय

सत्यमेव जयते